International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 4 January – February - 2026

# स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास धोरणे आणि मराठी कादंबरी

**डॉ. पल्लवी अनिल कोडक**

*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*

*Corresponding Author –* ***डॉ. पल्लवी अनिल कोडक***

**DOI - 10.5281/zenodo.18491299**

**सार *(Abstract):***

*१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पायाभूत सुविधांच्याविकासाचा मोठा टप्पा सुरू झाला. आर्थिक विषमता,अपुरी पायाभूत साधने, दारिद्र्य, निरक्षरता आणि सामाजिक असमतोल या समस्यांवर मात करणे हे नवस्वतंत्र भारतासमोरचे प्रमुख आव्हान होते. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने नियोजनबद्ध विकासाचा मार्ग स्वीकारला. पंचवार्षिक योजना, सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार, औद्योगिकीकरण, कृषी सुधारणा, धरणे, रस्ते, वीज, शिक्षण व आरोग्य सुविधा यांद्वारे विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सर्व विकास प्रक्रियेचा केवळ आर्थिक व राजकीय परिणामच झाला असे नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनावरही त्याचा खोलवर प्रभाव पडला. मराठी साहित्याने स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास धोरणांकडे केवळ प्रशंसात्मक दृष्टीने न पाहता, त्यातील विरोधाभास, विस्थापन, शोषण, आणि मानवी मूल्यांवरील परिणाम यांचा चिकित्सक वेध घेतला. प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास धोरणे आणि त्यांचे मराठी कादंबरीतील प्रतिबिंब यांचा अभ्यास करणे हा आहे.*

## संशोधनाची उद्दिष्टे:

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रमुख विकास धोरणांचा आढावा घेणे.
२. या विकास धोरणांचा समाजजीवनावर झालेला परिणाम समजून घेणे.
३. मराठी कादंबरीत विकास प्रक्रियेचे प्रतिबिंब कसे उमटले आहे याचा अभ्यास करणे.
४. कादंबरीने विकासाच्या संकल्पनेविषयी मांडलेला चिकित्सक दृष्टीकोन स्पष्ट करणे.

सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

## स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास धोरणांचा आढावा:

स्वातंत्र्यानंतर भारताने समाजवादी विचारसरणीवर आधारित मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून (१९५१-५६) कृषी विकास, सिंचन प्रकल्प आणि अन्नसुरक्षा यांवर भर देण्यात आला. भाकरा नांगल, कोयना, हिराकूड यांसारखी मोठी धरणे उभारण्यात आली. पुढील योजनांमध्ये औद्योगिकीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, पोलाद कारखाने, वाहतूक व दळणवळण यांचा विस्तार झाला. या विकास धोरणांमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली; मात्र त्याच वेळी ग्रामीण-शहरी दरी, श्रीमंत-गरीब विषमता, प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन आणि पर्यावरणीय ऱ्हास या समस्या तीव्र झाल्या. या विरोधाभासी वास्तवाचे भान मराठी साहित्यिकांनी तीव्रतेने व्यक्त केले.

**मराठी साहित्यात विकास संकल्पनेचे प्रतिबिंब:**

स्वातंत्र्यानंतरच्याकाळाचे आणखी एक महत्त्वाचे सूत्र म्हणजे आधुनिकीकरण होय. व्यक्तिवाद व विवेकवाद ही तत्त्वे आधुनिकतेशी संबंधित होती.महत्त्वाची गोष्ट म्हणजे वसाहतवादी राज्य यंत्रणेने पुरस्कृत केलेले नवे यांत्रिक तंत्रज्ञान, दळणवळणाची तुलनेने सुलभ झालेली साधने, उद्योग व्यवसायांची निर्मिती या सर्वांमधून निर्माण झालेले वातावरण होय. या परिस्थितीमुळे मनुष्य संख्या एका भौगोलिक अवकाशातून दुसऱ्या भौगोलिक अवकाशाकडे मोठ्या प्रमाणात हलवली जाणे शक्य झाले. आपला प्रदेश आणि पारंपरिक व्यवसाय सोडून खेडेगावातील लहान शेतकरी, शेतमजूर व छोटे व्यवसाय शहराकडे धाव घेऊ लागले. पारंपारिक जीवन पद्धतीमध्ये यामुळे नवे ताणतणाव निर्माण होऊ लागले. मोठी लोकसंख्या केंद्रित झाल्यामुळे आणि तिचा फार मोठा भाग शोषणाचा अनुभव घेत असल्यामुळे शहरे बकाल आणि खेडी ओस होऊ लागली.पारंपरिक मध्यमवर्गीय जाणिवेला छेद देणारे आधुनिकवादी विश्वभान बा.सी. मर्ढेकर यांच्या कादंबऱ्यांमधून स्पष्टपणे दिसून येते.आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये उत्पादन केला गेलेला हा पूर्ण यांत्रिक मानव, त्याचे जगणे, आजूबाजूच्या जगाचा अनुभव हे रात्रीचा दिवस कादंबरीचे आशयसूत्र आहे.*तांबडी माती* आणि *पाणी* त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आधुनिकता आणि आधुनिकीकरण यांच्या विषयीची त्यांची आधुनिकवादी अशी सूत्रे दिसतात. आधुनिकरणाच्या प्रक्रियेने आलेले तुटलेपण, मानवी व्यक्तिमत्त्वाचे आणि सामाजिक संस्थांचे झालेले विघटन, नव्या भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेमधले माणसाचे क्षुल्लक होत जाणे यासारख्या गोष्टींना *तांबडी माती* आणि *पाणी* या दोन्ही कादंबरीच्या संदर्भात संघटनासूत्रांचे महत्त्व प्राप्त होते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कादंबरीने परिवर्तनाच्या प्रक्रियेत असलेले खेडे आपल्या रूपबंधात पकडण्याचा प्रयत्न केला आहे. खेड्यांचा इतर भागाशी संबंध येऊ लागला आहे. उत्पादनाच्या साधनांमध्ये महत्त्वाचे फेरबदल होऊ लागले आहेत. शहरे आणि खेडी यांच्यामध्ये नवे संबंध प्रस्थापित होत आहेत. रस्त्यांचे जाळे विणले जाऊ लागले आहे. प्रवास तुलनेने सुलभ झाला आहे. शतकानुशतके चालत आलेली जीवनाची पारंपरिक लय आणि निसर्गाशी तादात्म्य पावलेली काळाची जाणीव नष्ट होत आहे. प्रत्यक्षातले खेडे या अवस्थेमध्ये आहे. मराठी कादंबरीने रूपबंधाच्या दृष्टिकोनातून या बदलांना स्पर्श केला.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात १९७५ नंतरच्या कालखंडात वेगाने परिवर्तन घडू लागले. सहकार चळवळ, साखर कारखानदारी,वेगाने होणारे शहरीकरण, आधुनिकीकरणाच्या हायब्रीड बी-बियाण्यापासून रोख पैसे देणाऱ्या पिकांना महत्त्व आणणाऱ्या विविध प्रक्रिया, माध्यमांचा वाढता प्रभाव, राजकारणाचे बदललेले स्वरूप, जातीव्यवस्थेला पुन्हा प्राप्त होऊ लागलेली प्रतिष्ठा यासारख्या अनेक गोष्टीमुळे ग्रामीण जीवनाचा पोत बदलू लागला. ग्रामीण जगण्याची संथ पारंपरिक लय नष्ट होऊ लागली होती. परंपरेने चालत आलेले व्यवसाय करण्यापेक्षा नवे पांढरपेशी उद्योग करून शहरात स्थायिक होण्याची इच्छा ग्रामीण तरुणांच्या मनात निर्माण होऊ लागली होती. शिक्षणप्रसारामुळे शहाण्या झालेल्या तरुण ग्रामीण लेखकाचे लक्ष वेधून घेणाऱ्या या घटना होत्या. शहरात राहून ग्रामीण जीवनाचे स्मरणरंजनयुक्त चित्र काढण्याचे दिवस आता संपू लागले होते. खेड्यात किंवा निमशहरी भागात राहणारा आणि नव्याने निर्माण झालेल्या वातावरणाचा साक्षात अनुभव घेणारा नवा ग्रामीण लेखक वर्ग निर्माण होऊ लागला होता. आधुनिकीकरणामुळे धरणे आली,

पाणीपुरवठा सुरू झाला. रोख पैसे घेऊन विकता येतील अशी पिके काढता येऊ लागली. धरणामुळे लोक विस्थापित झाले उत्पादनांचे व्यापारीकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे कर्ज काढणे अपरिहार्य झाले. दुष्काळ, भूकंप, पाणीटंचाई अशी नैसर्गिक संकटे तर पूर्वीपासून होतीच. तथापि, आता त्यांना शासकीय अनावस्थेचे परिणाम प्राप्त झाले. सातत्याने होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आंदोलन करणे या आणखी एका कथाबंधाने ग्रामीण कादंबरीत प्रवेश केला आहे.

आनंद यादव यांच्या *गोतावळा* कादंबरीत नारबा नावाच्या सालकरी गड्याच्या माध्यमातूनव आधुनिकतेच्या रेड्यात तुटणाऱ्या ग्रामीण जीवनातील शोकांतिका आणि मानवी नात्यांमधील गुंतागुंत अत्यंत प्रभावीपणे मांडते. या कादंबरीत कोल्हापूरच्या ग्रामीण बोलीचा वापर करून शेतमजूर निसर्ग आणि यंत्र युगातील संघर्ष याचे वास्तववादी चित्रण केले आहे.

नवीन शिलाई मशीन आल्यावर खेड्यातल्या शिलाई करणाऱ्या टेलरला काय अडचणी आल्या, त्याचं वर्णन करणारी *'पाचोळा'* सारखी कादंबरी बोराडेयांनी लिहिली. त्या कादंबरीमध्ये त्यांनी गरीब आणि श्रीमंत यांच्यातील नातेसंबंधांचं चित्रण खूप सुंदर पद्धतीने केले.१९७१ मध्ये प्रकाशित झालेली, *पाचोळा*ही एका शिंप्याची पत्नी पार्वतीची कथा आहे, जी आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कारागिरांच्या जीवनात निर्माण झालेल्या भावनिक ताणातून बाहेर पडते. ही कथा पार्वतीच्या दृष्टिकोनातून कथन केली आहे आणि तिच्या कौटुंबिक जीवनातील दयनीय पतनाचे वर्णन करते.तसेच बोराडे यांच्या *पाचोळा* कादंबरीत जमीन सुधारणा, सहकारी संस्था, कृषी विकास यांचे अपयश, शेतकरी आत्महत्या, दारिद्र्य, वर्गसंघर्ष आला आहे. ग्रामीण कादंबऱ्या विकासाच्या ग्रामीण वास्तवाची चिकित्सा करतात.

व्यक्ती, कुटुंब, गाव यांतील सहसंबंधाच्या वेगळ्या परी शोधणारे कृष्णात खोत व्यक्ती आणि समूहकेंद्राकडून आता माणूस आणि निसर्ग, माणूस आणि प्राणी यांच्यातील सनातन संघर्षाची रूपं शोधत आहेत. *'रिंगाण'* मध्ये देवाप्पाची गावापासून उखडल्याची वेदना आणि पाळीव प्राण्यांचं मूळ आदिम हिंस्रभावाकडे होणाऱ्या स्थानांतराचं चित्रण आहे. माणूस आणि प्राणी, विकास आणि आधुनिकपूर्व जगातले अंतर्विरोध यांच्यातल्या सूक्ष्म परी ते कादंबरीत आणत आहेत. याआधीही मराठी कादंबरीत विस्थापनाची समूहदर्शनं आलेली आहेत. *'पाणी'* (बा. सी. मर्ढेकर) ते *'झाडाझडती'* (विश्वास पाटील)पर्यंत धरणग्रस्तांच्या माहोलाचं चित्रण आहे. मात्र कृष्णात खोत हे समूह-दर्शनाबरोबर मानव आणि निसर्ग, मानव आणि प्राणी यांच्यातल्या संबंधांना विविध परिमाणं प्राप्त करून देत आहेत.विकास, प्रगतीच्या चौखूर वाटचालीत अनेक प्रकारचे अंतर्विरोध निर्माण होत आहेत. धरण बांधल्यानंतर स्थानिक आपल्या गावा-मुळांपासून तुटतात. ही वेदना आयुष्यभर पीडित समूहांना वागवावी लागते. ग्रामीणजीवनातीलविस्थापनाच्या प्रश्नावरभाष्य करणारी *रिंगाण* कादंबरी आहे.

विश्वास पाटील यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त*झाडाझडती* ही कलाकृती प्रखर वास्तव समोर आणते. धरण होयच्या घटनेभोवती फिरणाऱ्या आयुष्याची, क्रियाप्रतिक्रियांची ही व्यापक कहाणी आहे. दहा-पंधरा वर्षांच्या काळातील, प्रदेशातील आणि मानवी जीवनातील बदल कादंबरीत टिपले आहेत. धरण, धरणग्रस्त, समाज, संघटना, राजकारण आदींचा वेध कादंबरीने घेतला आहे. धरण बांधले जाते, तेव्हा गाव विखरून जाते. गावात राहणारी माणसं विस्थापित होतात. तेव्हा त्यांचे काय होते, त्यांची मानसिक अवस्था कशी असते, पुनर्वसनातही राजकारण कसे येते आणी या सगळ्या माणसाचे जगणे

कसेस्वस्त होऊन जातेयाचे सूक्ष्म दर्शन पाटील यांनी कादंबरीतून घडविले आहे.

*तहान* या सदानंद देशमुख यांच्या कादंबरीत पाणी टंचाईच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय या समस्येमुळे साधलेले आणि नंतर ढासळलेले अर्थकारण आणि या दोहोंमध्ये आपल्या आयुष्याची नासाडी करणारा युवक, पाणीटंचाईकडे कानाडोळा करणारे शासन आणि गावकऱ्यांनी संघटितपणे आंदोलनाचे शस्त्र उगारल्यावर थातूरमातूर उपाययोजना करणारे लोकप्रतिनिधी यांचे चित्रण या कादंबरीत आहे.

**निष्कर्ष:**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास धोरणे राष्ट्र उभारण्यासाठी आवश्यक होती मात्र त्यांची अंमलबजावणी करताना मानवी मूल्ये, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक वास्तव दुर्लक्षित राहिले.
२. मराठी कादंबरीकारांनी या विकास प्रक्रियेचा वास्तववादी संवेदनशील आणि चिकित्सक वेध घेतला.
३. गोतावळा, पाचोळा, झाडाझडती, रिंगाण, तहान यासारख्या कादंबऱ्यांनी विकासाच्या झगमटामागील सामान्य माणसाची वेदना मांडली आहे.
४. स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी ही विकास धोरणांचा मानवी इतिहास मांडणारी महत्त्वाचा साहित्यप्रकार ठरते.
५. औद्योगिकीकरण, कृषी धोरणे, शहरीकरण आणि सामाजिक न्यायया सर्व क्षेत्रातील विसंगतीचे चित्रणमराठी कादंबरीत पडलेआहे.
६. मराठी कादंबरी ही स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास प्रक्रियेचा सामाजिक दस्तऐवज ठरते.

**संदर्भ:**


१. (सं.) जाधव रा.ग., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा १९५०ते२००० भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे पहिली आवृत्ती, आक्टोंबर २०१०.
२. पाटील विश्वास,झाडाझडती, राजहंसप्रकाशन,पुणे प्रथम आवृत्ती,१९९०.
३. देशमुखसदानंद, तहान,कॉन्टिनेन्टलप्रकाशन, पुणेप्रथमआवृत्ती,२००४
४. बोराडे रा रं, पाचोळा, मौज ग्रंथालयप्रकाशन, मुंबई, १९७१.
५. यादव आनंद, गोतावळा, मेहता प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती, १९७१.
६. खोत कृष्णात, रिंगाण,शब्दपब्लिकेशन,मुंबई पाचवीआवृत्ती,१५जानेवारी२००४.